Indian Streams Reserach Journal
Vol.2,Issue.I/ Feb; 12pp.1-4

ISSN:-2230-7850

Research Papers

# अध्यापनाच्या नवीन कार्यनीती

डॉ.श्रीमती पटवारी आर.व्ही.
कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन
सोलापूर.

डॉ.श्रीमती पांढरे व्ही.डी.
कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन
सोलापूर.


## *प्रस्तावना :–*

शिक्षक प्रशिक्षण कार्य राबविताना तात्विक आणि प्रात्यक्षिक कार्याची सुसंगत जुळणी करावी लागते. ही जुळणी करतांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. णव्याने येत असलेले घटक तसेच प्रात्यक्षिक कार्य यामध्ये सुसुत्रता आणण्याचे काम शिक्षकप्रशिक्षकास करावे लागते. आज "रचनावाद" हा नव्याने आलेला प्रवाह तात्विक अभ्यासकमात समाविष्ट झालेला आहे. परंतु प्रत्यक्षात तात्विक अभ्यासकमात घटकांसाठी त्याचा उपयोग करताना दिसून आलेला नाही. म्हणून 'रचनावादाच्या' विविध पध्दतींपैकी 'संकल्पना आरेखन' पध्दतीचा समावेश करून तात्विक घटकाचे अध्यापन कसे करावे हे निदर्शनास आणून देण्यासाठी म्हणून सदर संशोधन केलेले आहे.


समस्या विधान ः-

बी.एड्. प्रशिक्षणार्थींच्या अध्ययनामध्ये रचनावादावर आधारीत संकल्पना आरेखन पध्दतीने केलेल्या अध्यापनाच्या परिणामकारतेचा अभ्यास.

रचनावाद ः-

रचनावादाच्या मते "अध्ययन हे स्वयंरचित असते. सकिय असते सतत बदलणआरे असते अनुभव व संदर्भ याला महत्व देणारे असते आणि अध्यापन ही सामाजिक प्रकिया असते. यामध्ये शिक्षकांची भूमिका ही विद्यार्थ्यांची मानसिकता जाणून घेणे मार्गदर्शन करणे बोधात्मक आधार देणे व प्रत्येक विद्यार्थी क्षमता व गरजांचे मूल्यमापन करण्याचे असते."

"पूर्वज्ञानाच्या आधारे व्यक्ती नवीन संकल्पनाची रचना करते. यातून अध्ययन घडून येते यासच रचनावाद असे म्हणतात."

हया रचनावादाच्या विविध पध्दती आहेत. त्यामध्ये सदर संशोधनात 'संकल्पना आरेखन' पध्दतीच्या परिणामकारकतेचा विचार केला आहे.

संकल्पना आरेखन :-

संकल्पना आरेखन तंत्र हे 1960 मध्ये 'जोसेफ डी नोवाक' यांनी विकसीत केले. नोवाकचे कार्य असुबेलच्या बोधात्मक उपत्तीवर आधारित आहे. ज्या नवीन संकल्पना शिकवण्यासाठी पूर्वज्ञानाच्या महत्वावर भर दिला आहे. शिकण्यावर/अध्ययनावर प्रभाव टाकणारा सर्वात महत्वाचा घटक म्हणजे अध्ययनकर्त्याला अगोदर काय माहित आहे. ह्यपूर्वा ज्ञानह हा होय.

"संकल्पना" आरेखन' म्हणजे संकल्पना मधील संबंध दर्शविणारी आकृती होय.

"विविध संकल्पना मधील संबंध दर्शविण्यासाठी वापरण्यात येणारे तंत्र म्हणजे संकल्पना आरेखन (Concept Mapping) होय."

साधारणपणे संकल्पनाची मांडणी/ संरचना चौकट/ वर्तूळांच्या स्वरूपात वरून खाली अशा शाखांच्या रूपात श्रेणीबध्द व्यवस्थेत केलेली असते. हया संकल्पना निर्देशित बाणांच्या रेषांनी जोडलेल्या असतात.

संकल्पना आरेखनाचे विविध प्रकार ः-

1. रेषीय आरेखन (Line Concept Map)
2. वर्तूळाकार आरेखन (Circular Concept Map)
3. वृक्षाकार आरेखन (Tree Concept Map)

**Please cite this Article as** :डॉ.श्रीमती पटवारी आर.व्ही. & डॉ.श्रीमती पांढरे व्ही.डी. `,अध्यापनाच्या नवीन कार्यनीती : **Indian Streams Research Journal (Feb ; 2012)**

४. केंद्रिय आरेखन (Hubor Spoke Concept Map)

५. जालिका आरेखन (Network Concept Map)

६. प्रणाली संकल्पना आरेखन (System Concept Map)

अशा विविध संकल्पना आरेखनाचा वापर आपणास करता येते. तसेच स्वतःच्या कल्पनेंनी विविध पध्दतीच्याद्वारे संकल्पन आरेखन विकसीत करता येते.

संकल्पना आरेखन पध्दतीचे फायदे
१. एका दृष्टीक्षेपात विस्तृत माहिती
२. माहितीची संक्षिप्त पध्दतीने मांडणी करण्यासाठी
३. परस्पर संबंध दर्शविण्यासाठी
४. गुंतागुंतीच्या माहितीचे स्पष्ट चित्रण
५. लेखन शैलीत सुधारणा

संकल्पना आरेखनाची परिणामकारकता :-

प्रस्तृत शोध निबंधामध्ये घटक शिकविताना पारंपारिक अध्यापन आणि संकल्पना आरेखन पध्दतीने केलेले अध्यापन यांच्यातील परिणामकारकतेचा विचार केला आहे.

संशोधन अभ्यासाची गरज :-

१. आज या रचनावादावर आधारित नवनवीन पध्दतीची परिणामकारकता प्रशिक्षणार्थींना समजावी.

२. अध्यापनासाठी योग्य पध्दतीची निवड करता येणे गरजेचे आहे.

३. प्रशिक्षणार्थींना अध्यापन करत असताना नेमके कसे अध्यापन करणे गरजेचे आहे हे समजण्यासाठी एकच आशय प्रशिक्षणार्थींना दोन पध्दतीने वर्गात शिकविण्यासाठी मार्गदर्शन करण्याची गरज संशोधकास वाटली.

महत्व :-

१. आरेखन पध्दतीच्या आधारे एखाद्या घटकाचे मांडणी कौशल विकसित होईल.

२. प्रशिक्षणार्थींचे लेखन कौशल्य विकसित होई ल.

३. प्रशिक्षणार्थींमध्ये एकाच घटकाचा विस्तृत भाग एका दृष्टिक्षेपात मांडण्याचे कौशल्य विकसित होईल.

४. अध्ययन : अध्यापन प्रकिया परिणामकारक होईल.

उद्दीष्टे :-

१. पारंपारिक व्याख्यान पध्दतीच्या आधारे वेदकालीन शिक्षणाच्या ध्येयाचा अभ्यास करणे.

२. संकल्पना आरेखन पध्तीच्या आधारे वेदकालीन शिक्षणाच्या ध्येयाच्या सादरीकरणाचा अभ्यास करणे.

३. पारंपारिक व्याख्यान पध्दती व संकल्पना आरेखन पध्दतीच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे.

पध्दती :-

१. सदर संशोधनासाठी प्रायोगिक पध्दतीचा वापर केला.

२. प्रायोगिक पध्दतीमध्ये समतुल्य अभिकल्पाचा वापर केला गेला.

परिकल्पना :-

पारंपारिक व्याख्यान पध्दतीने अध्यापन आणि संकल्पना आरेखन पध्दतीने अध्यापन केल्यास दोघांमध्ये कोणताही फरक पडत नाही.

संशोधन कार्यपध्दती :-

बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांचे पदवीच्या निकालाच्या आधारे ४०४० विद्यार्थ्यांचे दोन गट तयार केले. एकाच घटकाचे दोन पध्तीने अध्यापन केले योजना तयार केली.

नियंत्रित गटावर पारंपारिक पध्दतीने हव्याख्यान पध्दतीनेह अध्यापन केले.

प्रायोगिक गटावर संकल्पना आरेखन पध्दतीचा आधार घेवून अध्यापन केले.

खालील पध्तीने घटकाचे आरेखन केल`व अध्यापनात त्याचा वापर केला.

विषय : भारतीय शिक्षणप्रणालीचा विकास व माध्यमिक शिक्षण.

घटक : १. वेदकालीन

उप घटक : वेदकालीन शिक्षणाची ध्येये

उद्दिष्ट : १. वेदकालीन उच्च ध्येयांचे महत्व पटवून देणे.
२. मानवी जीवनाचे महत्व पटवून देणे.

पाठाची साध्यता : विद्यार्थी स्वतः अर्थ विविध उदाहरणे उपक्रम यांच्यातील परस्पर संबंध सांगण्यास सहभाग नोंदवून अध्यायनाद्वारे स्वतः संकल्पनेचे आरेखन करेल.

पहिली पायरी : १. घटकाच्या आशयाचे वाचन करणे.
२. घटकाच्या मूळ हेतूचे स्पष्टीकरण.
३. नवीन मुद्दयांची यादी तयार करणे.
४. उपक्रमांची यादी तयार करणे.
५. मुख्य घटकाला अनुसरून सर्व उपघटकांची फलकांवर मांडणी करणे.

दुसरी पायरी : १. फलकावरील उपक्रमांची मांडणी विद्यार्थ्यांच्या मदतीने स्पष्ट करणे.
२. अर्थ व उदाहरणे परस्पर मांडणी.
३. विद्यार्थी मांडणीचा आढावा.

तिसरी पायरी : १. पाठयघटकाची पुनश्च उजळणी
उजळणी करतांना मुख्य संकल्पनेचे स्पष्टीकरण फलकाच्या आधारे मांडणे.

## वेदकालीन शिक्षणाची ध्येये

1. धार्मिकता व पाविव्य मनावर बिंबविणे. 2. चारिज्याची घडण करणे. 3. सुसंपन्न व्यक्तिमत्वाचा पया घालणे. 4. सामाजिक व नागरिक कर्तव्यांची ओळख करून देऊन समाजाच्या कार्यक्षमतेत व सौख्यास हातभार लावणे. 5. संस्कृतीचे रक्षण व संवर्धन करणे.

धार्मिक संस्कार, नियमांचे पालन
व्रते, शिक्षणाने स्वभावाची घडण.
विद्यार्थी-राष्ट्राची संपत्ती
1. आत्मकेंदी न होता सामाजिकतेची जाण.
संस्कृति व सामाजिक सातत्य.

दैनंदिन प्रार्थना, परंपरा
नैतिकता मनावर
संस्कृतीचा वारसदार
व्यक्तिच्या अनेक
विचार व आचार

उत्सव, सण
बिंबणे, माणूस चाारिज्यसंपन्न
भूमिका
पिता,पुत्र, भ्राता

सद्‌गुण,विद्वता यांना महत्व
स्वाभिमान
आत्मविश्वास
ऋणांची संकल्पना

गुरूंचा उपदेश
पूरक वातावरण
उत्तम सवयी
अतिथीदेवोभवः
वैदिक वाड.मयाचे संरक्षण

वर्णव्यवस्था

निष्पत्ती ः

1. उत्तम नागरिकत्वाची निर्मिती
2. उत्तम क्षात्रधर्माची जोपासना
3. व्यक्तिमत्वाचा उत्कर्ष
4. ज्ञान धर्म चारिज्यसंपन्नता
5. सामाजिक कर्तव्याची जाणिव
6. ज्ञानाची पूर्ती आत्मज्ञानात
7. आत्मसाक्षात्कार
8. आत्मानुभूती व मोक्षप्राप्ती.

अशा प्रकारे संकल्पना आरेखनाच्या साहाय्याने उपघटकाचे अध्यापन करण्यात आले.
अध्यापनानंतर दोन्ही गटांची 20 मार्कांची चाचणी घेण्यात आली.

विश्लेषण व अर्थनिर्वचन ः-

नियंत्रित गटाचे मध्यमान (M) - 9.82
नियंत्रित गटाचे प्रमाण विचलन (S.D.) - 3.33
प्रायोगिक गटाचे मध्यमान (M) - 12.45
प्रायोगिक गटाचे प्रमाण विचलन (S.D.) - 3.44

| गट | विद्यार्थी प्रमाण | मध्यमान | प्रमाण विचलन | मूल्य |
|---|---|---|---|---|
| नियंत्रित | 40 | 9.82 | 3.33 | |
| प्रायोगिक गट | 40 | 12.45 | 3.44 | 2.021 |

पारंपारिक व्याख्या पध्दतीने घटकांचे अध्यापन केल्यानंतर मिळालेल्या गुणांचे मध्यमान 9.82 आहे. प्रमाण विचलन 3.33 आहे. संकल्पना आरेखन पध्दतीने घटकांचे अध्यापन केल्यानंतर चाचणीद्वारे मिळालेले गुणांचे मध्यमान 12.45 आहे. तर प्रमाणविचलन 3.44 आहे. प्रमाण विचलनाचा वापर करून त मूल्य हे 2.021 आहे. तर 0.05 सार्थकता स्तराची किंमत 2.01 किंवा त्यापेक्षा जास्त असावी लागते. प्रस्तूत संशोधनाचे त मूल्य हे 2.021 आहे. दोन गटातील फरकावरून लक्षात येते की शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल.

निष्कर्ष ः

1. संकल्पना आरेखन पध्दतीद्वारे घटकांचे अध्ययन परिणामकारक आले.
2. अध्ययन अध्यापन प्रकिया रूचीपूर्ण अर्थपूर्ण आणि कृतीपूर्ण झाली.
3. पारंपारिक व्याख्यान पध्दतीपेक्षा संकल्पना आरेखन पध्दतीने अध्यापन करतांना प्रशिक्षणार्थींचा सहभाग वाढला.

**Please cite this Article as :**डॉ.श्रीमती पटवारी आर.व्ही. & डॉ.श्रीमती पांढरे व्ही.डी. `,अध्यापनाच्या नवीन कार्यनीती : **Indian Streams Research Journal (Feb ; 2012)**

4 . प्रशिक्षाणार्थींच्या लेखन कौशल्यात संकल्पना आरेखनाचा प्रभाव दिसून आला .

5 . प्रशिक्षणार्थींमध्ये संशोधकवृत्ती विकसीत झाली .

शिफारशी :

1 . संकल्पना आरेखन पध्दतीने घटकाचे अध्यापन करावे .

2 . संकल्पना आरेखन पध्दतीने घटकाचे अध्ययन करावे .

संदर्भ सूची :

1 . भिंताडे वि . रा . (2008) :- शैक्षणिक संशोधन पध्दती तृतीता आवृत्ती नित्यनूतन प्रकाशन .

2 . मुळे रा . शं . उमाठे वि . तु . : (1998) :- शैक्षणिक संशोधनाचे मूलतत्वे तृतीय आवृत्ती नागपूर महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ .

3 . सप्रे एन . पाटील पी : पाटील ज़े : (2009) :- गतिमान शिक्षणासाठी विचार प्रवाह कोल्हापूर फडके प्रकाशन .

समारोप :

शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम हा वैविध्यपूर्ण कार्यक्रम आहे . अशाप्रकारे अध्यापन करतांना प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले तर शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमांत नाविण्यता विकसित होईल . आणि प्रशिक्षणार्थींमध्ये लागेल . कठीण व क्लिष्ट प्रकारचे घटक सोपे करून अध्ययन व अध्यापन करण्याची सवय लागेल .

**Please cite this Article as :**डॉ.श्रीमती पटवारी आर.व्ही. & डॉ.श्रीमती पांढरे व्ही.डी. `,अध्यापनाच्या नवीन कार्यनीती : **Indian Streams Research Journal (Feb ; 2012)**